क्र.प्राअवि/एनसीटीई/२००८-२००९/नअवि/अति.तु/ ३०८

डीएड प्रवेश कक्ष/डिडिप्रकृ-2

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

दिनांक- ११/७/२००८

प्रति,

प्राचार्य,

निनाईदेवी शिक्षक प्रसारक मंडळाचे
शिवाजीराव देशमुख अध्यापक विद्यालय, शिराळा
ता. शिराळा जि. सांगली

विषय-सन २००८-२००९ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विद्यालय/अतिरिक्त तुकडीस कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यतेबाबत

संदर्भ- १) एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. APW0 1224 50
दिनांक 29/1/2008

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे प्रवेश परवानगीचे आदेश क्रमांक टिसीएम-२००८/प्र.क्र.(२२२/०८)/माशि-४ दिनांक ८-७-२००८

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेस नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तींच्या अधीन राहून सन २००८-२००९ पासून नवीन अध्यापक विद्यालयास/अतिरिक्त तुकडीस परवानगी देण्यात आलेली आहे. खालील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन अध्यापक विद्यालयाच्या व्यवस्थापनाने करावे. त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची एन.सी.टी.ई. भोपाळ च्या व महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) मधील तरतुदीस अधीन राहून नेमणूक करावी. वय वर्षे ५८ पेक्षा जास्त वयाचे प्राचार्य किंवा अध्यापकांची नेमणूक करता येणार नाही.

३) नेमलेल्या सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना विभागीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

४) प्रवेशाच्या वेळी प्रचलित शासन धोरणानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रवेश करण्यात येतील.

५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतलू जावे व त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) अध्यापक विद्यालय विनियमन प्राधिकरण,पुणे (व्दारा-महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०) प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे मार्फत सादर करावा.

७) नियमाप्रमाणे अनुज्ञेय व्यवस्थापनाच्या प्रवेशांच्या जागा भरण्यास आपणास परवानगी देण्यात येत आहे. व्यवस्थापनाच्या प्रवेशाच्या जागा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) व्यवस्थापन कोटा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. व्यवस्थापन अगर शासकीय कोटयातील प्रवेश देताना कोणाही उमेदवारांकडून डोनेशन/देणगी अथवा निर्धारित शुल्कापेक्षा जादा शुल्क घेतले जाणार नाही याची काळजी घेतली जावी. याबाबत कोण ी तक्रार आल्यास महाराष्ट्र कॅ.फी अॅक्ट १९८७ मधील कलमांच्या तरतुदींनुसार संबंधित अ.वि.व्यवस्थापनावर कारवाई केली जाईल.

९) दर वर्षी एन.सी.टी.ई ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसह सादर करण्यात यावेत.

१०) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ. बाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल.

११) चालू शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मध्ये आपल्या अध्यापक विद्यालयात केंद्रीय प्रवेश विभाग स्तर व राज्यस्तरावरुन करण्यासाठी प्रवेश प्रक्रियो शुल्क प्रति तुकडी प्रमाणे शासनाच्या क्र.टीसीएम २००८/प्र.क्र.(२२२/०८)/माशि-४ दिनांक ८-७-२००८ अन्वये रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख ) शुल्काचा डी.डी. अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एड प्रवेश, निवड, निर्णय तथा नियंत्रण समिती, यांचे नावे पुणे येथे दिनांक २५-७-२००८ पर्यंत अथवा परिषदेत जमा करावा.डी.डी जमा केल्यानंतर आपल्या विद्यालयाचा प्रवेश प्रक्रीयेत समावेश करण्यात येईल.

१२) अध्यापक विद्यालय चालविताना ते सुरळीत चालावे म्हणून संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, डाएट, विभागीय शिक्षण उपसंचालक, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे वेळोे मार्गदर्शक घेऊन कार्यवाही केली जाईल.

१३) सदर अध्यापक विद्यालयास महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेची संलग्नता घेणे बंधनकारक राहिल.सोबत दिलेल्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्पवर लेखी हमीपत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावे.

१४) तपासणी अहवालातील खालील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे. अध्यापक विद्यालय सुरु झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत अटींची पूर्तता करावी.

१) अध्यापक विद्यालयासाठीची इमारत अपुरी आहे.
२) साहित्य अपुरे आहे.
३) अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक
४) त्या सुविधा ज्या अधिक प्रमाणात उपलब्ध असतील

## अध्यापक विद्यालयाचा तपशील

| NCET CODE NO'& DATE | अध्यापक विद्यालयाचे नाव व ठिकाण (पत्ता) | फोन नंबर फॅक्स ई-मेल | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे व |
|---|---|---|---|---|---|---|
| IPWO 221450 3/11/08 | निलाई देवी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिवाजीराव देशमुख अध्यापक विद्यालय शिराळा ता. शिराळा. जि. सांगली | - | मराठी | मिश्र | 40+10 | २००८-२००९ |

स्थळप्रत मा. संचालक यांचें स्वाक्षरीत.

Thakur RR

संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० करिता.

प्रत,

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर
२. विभागीय शिक्षण उपसंचालक--कोल्हापूर-- विभाग--कोल्हापूर----------
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना पुढील कार्यवाहीसाठी
४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
५. डी.एड प्रवेश कक्ष (अध्यापक विद्यालयांच्या सुधारित यादीसाठी)